# CONFLUX
## JOURNAL OF EDUCATION

ISSN 2320-9305 (PRINT) ISSN 2347-5706 (ONLINE)

A PEER REVIEWED JOURNAL PUBLISHED SINCE 2013

VOLUME 12 ISSUE 1 DECEMBER 2023

cjoe.naspublishers.com

# ONLINE NATIONAL CONFERENCE
# ON
# SUSTAINABLE EDUCATION:
# LOCAL AND GLOBAL PROGRESS AND CHALLENGES

**10 October 2023**

*Organised By:*

**INTERNAL QUALITY ASSURANCE CELL (IQAC)**

**MES'S PILLAI COLLEGE OF EDUCATION AND RESEARCH**

CHEMBUR

*Organised By:*

**NIRMALA MEMORIAL FOUNDATION COLLEGE OF EDUCATION**

KANDIVALI

CONFLUX
JOURNAL OF EDUCATION
ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

# INDEX


| Sl. | Title | Page |
|---|---|---|
| 1 | **Effectiveness of Project Based Learning in Enhancing 21st Century Skills of Student Teachers**<br>Miss Smruti Salve & Dr. Rekha Chavhan | 1-12 |
| 2 | **Experiential Learning for Sustainability**<br>Dr. Anjali G. Kirkinde | 13-18 |
| 3 | **Sustainable practices in Education - Experiential Learning Combined with the Hybrid approach is the need of the hour**<br>Mrs. Kalyani Arumugam & Dr. Reni Francis | 19-24 |
| 4 | **Deployment of Community-Based Programs for Optimizing Global Citizenship Education and Education for Sustainable Development**<br>Dr. Vidhya Satish | 25-37 |
| 5 | **Understanding the scenario of Single Use Plastic in the State of Goa**<br>Pednekar Amisha* R. | 38-43 |
| 6 | **Role of Education in fostering Global Citizenship**<br>Mrunali Rupesh Pansare | 44-48 |
| 7 | **Learning practices toward sustainability Conceptual framework for blended and active constructive Learning in the classroom to engage students**<br>Sharmistha Kant & Nitya Potham | 49-62 |
| 8 | **Teaching Learning Practices towards Sustainability**<br>Dr. Archana Thakre | 63-70 |
| 9 | **Effect of Outcome Based Education (OBE) on Academic Achievement of Student –Teachers**<br>Ms. Archana Bhople | 71-78 |
| 10 | **Innovative Teaching Learning Strategies for Sustainability**<br>Dr. Vinayak Shinde & Dr. Rupali Wadkar | 79-92 |
| 11 | **Teaching Learning Practices towards Sustainability**<br>Tejal Nikam | 93-105 |
| 12 | **The Role of Holistic Education in Sustainable Development**<br>Miss. Seema L. Kadam | 106-124 |
| 13 | **Sustainable Practices in Education**<br>Dr. Mrs. Vidyullata Kolhe | 125-132 |

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/


| | | |
|---|---|---|
| 14 | **Enhancing Critical Thinking Skills through Lifeskills Education Programme**<br>Dr. Vithoba Sawant | 133-140 |
| 15 | **The Sustainable Teacher**<br>Ms. Reema Nikalje | 141-147 |
| 16 | **The Importance of Global Citizenship Education in a Globalized World**<br>Dr. Shumaila Patrawala Siddiqui | 148-161 |
| 17 | **Social, Emotional and Ethical Learning**<br>A concept to build an inclusive community<br>Dr Manisha Ramesh Gawde | 162-176 |
| 18 | **The Role of Teachers Competencies in Education for Sustainable Education**<br>Dr. Nitisha Jha | 177-185 |
| 19 | **Higher education for sustainability: A global Perspective**<br>**Ms. Sweety Singh** | 186-193 |
| 20 | **Role of Education for Addressing Sustainability**<br>Mrs. Shubhangi Kore | 194-205 |
| 21 | **A Step Towards sustainability: Theme Based Teaching**<br>Ms. Anjana Tawani | 206-211 |
| 22 | **Perspective on Creating an Ecosystem to be Self-Sustainable**<br>Dr. Swati Sharma | 212-220 |
| 23 | **गडचिरोली जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक - आर्थिकस्तराचा शैक्षणिक गुणवत्तेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास**<br>कु. सुवर्णा ना. भोंगळे, डॉ. अर्चना के. ठाकरे | 221-237 |
| 24 | **शिक्षणातील शाश्वत पद्धती**<br>Dr. Mugdha Sangelkar | 238-250 |
| 25 | **वैश्विक नागरिकता के लिए शिक्षा**<br>Dr. Punam Kesharwani | 251-260 |

**CONFLUX**
JOURNAL OF EDUCATION
ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

# गडचिरोली जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक - आर्थिकस्तराचा शैक्षणिक गुणवत्तेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

कु. सुवर्णा ना. भोंगळे
पदव्युत्तर शिक्षण विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

डॉ. अर्चना के. ठाकरे
सहाय्यक प्राध्यापक
पदव्युत्तर शिक्षण विभाग, राष्ट्रसंत

## गोषवारा / सारांश (Summary)

सामाजिक स्तरीकरणात कुटुंब व समाज हे घटक प्रामुख्याने येतात. कुटुंब हा समाजातील लघुस्वरूपाचा घटक असून त्यातील प्रत्येक व्यक्ती हा समाजाचा घटक आहे. व्यक्तीला समाजात वावरण्यासाठी संस्कारक्षम बनविणे कुटुंबापासून सुरू होते, व्यक्तीचा संपर्क समाजाशी येतो व तो औपचारिक संस्था म्हणजेच शाळेच्या माध्यमातून स्वतःवर संस्कार करून घेत असतो. कुटुंबात व समाजात समाजातील निती नियमांच्या परिचयाचे ज्ञान प्राप्त होते किंवा ज्येष्ठांकडून करून दिल्या जाते. भावी आयुष्यात समाजात वावरण्यासाठी योग्य समायोजन क्षमता निर्माण करणे हे महत्त्वाचे असते. मुल जेव्हा शाळेत जाते, तेव्हा ते वेगवेगळ्या कौटुंबिक वातावरणातून प्रथमच सामाजिक वातावरणात प्रवेश करत असते. कुटुंबामध्ये संयुक्त व विभक्त कुटुंबाचे प्रकार दिसून येतात. कुटुंबाचा तसेच अनुवंशिकतेचा विद्यार्थी अध्ययनावर परिणाम होत असतो. कुटुंबातील अंतर्गत वातावरण किंवा कुटुंबाचा व्यवसाय, चालीरीती, संस्कार करण्याच्या पद्धतीचाही विद्यार्थी अध्ययन व विचार शैलीवर अनावधानाने परिणाम होतो. कुटुंबातील नातेसंबंध, कुटुंबाचा होणारा खर्च आणि इतर खर्चाचे मार्ग, समाजात मिळणारी

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

वागणूक किंवा बांधिलकी तसेच समाजाच्या प्रथा ,परंपरा याचाही परिणाम होतो. कुटुंबातील विद्यार्थ्यांवर होणारे संस्कार हे जेवढ्या प्रमाणात शैक्षणिक कामगिरीवर परिणाम करतात, त्याच प्रमाणात सामाजिक-आर्थिकस्तर उंचावणे किंवा घसरणे याचाही परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर होतो. कुटुंबात ,परिसरात तसेच शाळांमधून विद्यार्थ्यांवर होणारे संस्कार किंवा घरातील संस्कार यांचाही परिणाम विचारशैली दृढ होण्यावर होत असतो. संस्कार जर कडक शिस्तीचे असेल तर त्याचेही दुष्परिणाम विद्यार्थ्यांवर होताना दिसू येतात. कडक शिस्त ही माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी जेवढी फायद्याची ठरते तेवढेच भावनिक दृष्टिकोनातूनही दुष्परिणाम दिसून येतात. प्रत्येक कुटुंबाची आर्थिक परिस्थिती ही सारखीच दिसून येत नाही आणि याच फरकावरून श्रीमंत आणि गरिब स्तर म्हणजेच निम्न आर्थिक सामाजिक व उच्च आर्थिक सामाजिक असा फरक निर्माण होतो. त्यामुळे सामाजिक व आर्थिक स्तराचा माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर कोणता व किती प्रमाणात परिणाम होतो? हे अभ्यासणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रस्तुत संशोधनाची निवड संशोधिकेने केलेली आहे.

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागात येणाऱ्या जिल्ह्यांपैकी गडचिरोली हा एक जिल्हा आहे. गडचिरोली हा महाराष्ट्राचा ३१ वा जिल्हा म्हणून २६ ऑगस्ट १९८२ रोजी अस्तित्वात आला. आदिवासी जिल्हा व नक्षलवाद्यांचा जिल्हा म्हणून गडचिरोली जिल्ह्याची विशेष अशी ओळख आहे. गडचिरोली जिल्ह्यात लोकसंख्येची घनता व साक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याच्या इतर जिल्ह्यांच्या तुलनेत औद्योगिक दृष्ट्या मागासलेला जिल्हा आहे. या जिल्ह्यात शिक्षणाचा विकास फार कमी, अल्प गतीने झालेला आहे. साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे सामाजिक व आर्थिक विषमता खूप जास्त प्रमाणात आहे. व्यक्ती विकासावर व शिक्षणावर अर्थव्यवस्थेचा म्हणजेच आर्थिक परिस्थितीचा परिणाम होत असतो. व्यक्ती व्यक्ती म्हणून समाज

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

तयार होतो. समाजातील विभिन्न व्यक्ती या समान नसतात. अनेक कारणाने त्यांच्यात वैविध्य आढळते. त्यांचा दर्जा भिन्न असतो. या सामाजिक दर्जा नुसार त्यांची विविध गटात विभागणी होते. त्याला सामाजिक स्तरीकरण असे म्हणतात. मॅक व यंग यांच्या मते बहुतांश समाजामध्ये लोकांचे वर्गीकरण केले जाते आणि तयार झालेल्या वर्गाची उच्च पासून निम्न पर्यंत क्रमवारी ठरविले जाते. या वर्गीकरणाच्या प्रक्रियेला सामाजिक स्तरीकरण म्हणतात व क्रमवारी ठरविलेल्या वर्गांना स्तरीकरण संरचना म्हणतात. प्रत्येक समाजातील विविध प्रकारची श्रेणीबद्धता व उच्चतम स्तर आढळून येते. सामाजिक स्तरीकरणातील लवचिकता प्रत्येक समाजात भिन्न असते. भटक्या विमुक्त समाजातील स्तरीकरण लवचिक असते. पण जातीवर आधारित स्तरीकरण हे दृढ असते. सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार पडताना वेगवेगळ्या घटकांचा विचार करून स्तरीरिकरणाचे प्रकार करता येईल.

१) लिंग, वय ,वंश यासारखे जीवशास्त्रीय घटक लक्षात घेऊन केलेले स्तरीकरण

२) व्यवसाय, सत्ता, संपत्ती स्थिती या वर्ग वैशिष्ट्यांचा आधार घेऊन होणारे स्तरीकरण

३) व्यक्तीचे व्यक्तिमत्व, बुद्धिमत्ता यांच्या आधारे होणारे स्तरीकरण

अशा प्रकारे विविध घटक सामाजिक स्तरीकरणला कारणीभूत ठरतात. सामाजिक स्तरीकरणाचे वेगवेगळी कारणे आपल्याला पाहणे ही महत्त्वाची ठरते त्यामध्ये –

१) व्यक्तीच्या आर्थिक उत्पन्नातील भिन्नता

२) व्यक्तीच्या जन्मजात जातील भिन्नता

३) व्यक्तीच्या शिक्षणातील भिन्नता

४) व्यक्तीच्या सांस्कृतिक जीवनातील भिन्नता

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

५) व्यक्तीच्या वागणूकितील भिन्नता

६) व्यक्तीच्या राहणीमानातील भिन्नता

७) व्यक्तीच्या व्यवसायातील भिन्नता

यावरील कारणांशिवाय इतरही पूरक कारणांनी समाजाची अनेक वर्गात विभागणी होते. समाजामध्ये उच्च सामाजिक आर्थिक स्तर असणारे पालक वर्ग आपल्या पाल्यांना चांगल्या शाळेमध्ये शिकवतात व त्यांना सर्व सुख सुविधा उपलब्ध करून देतात. सर्वांनाच महाग शिक्षण आपल्या पाल्यांसाठी परवडत नाही. त्याचा अर्थ सामाजिक स्तरीकरणाबरोबरच समाजात असणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्येही स्तरीकरण चालू असते व यामुळे समाजातील विभिन्न वर्गातील अंतर कमी होण्याऐवजी वाढत जाते. भांडवलशाहीमुळे सामाजिक वर्गाची निर्मिती झाली. वर्गीकरणासाठी पैसा हा घटक महत्त्वाचा ठरला. कामगार, शेतकरी, शेतमजूर यांचे आर्थिक उत्पन्न कमी असल्याने ते सामाजिक दृष्ट्या निम्नस्तरात गणले जाते. व्यवसाय आणि वर्ग यात सहसंबंध निर्माण झाला. प्रत्येक वर्गातील संस्कृती, आवडी या भिन्न भिन्न असतात व्यक्ती स्वतःचे स्थान सामाजिक संरचनेत शोधतो. वरचा वर्ग प्राप्त व्हावा म्हणून व्यक्ती प्रयत्नशील असते. समाजात वावरताना सामाजिक स्तरातून, राहणीमानाची चढाओढ याचाही परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होताना दिसून येतो. शाळा सुद्धा या सामाजिक स्तरीकरणामुळे व तसेच आर्थिक स्तरीकरणामुळे विभागल्या गेलेल्या दिसून येतात. सामाजिक घटकात शाळा मोडतात. सहाजिकच या शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पात्रतेनुसार त्या शाळेचा स्तर ठरतो. समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी किंवा आर्थिक दृष्ट्या सक्षम असणारे विद्यार्थी असे अनेक शाळांमधून वेगवेगळे विभागले जाऊ शकतात. याचे कारण समाजातील आर्थिक स्तरीकरण शाळांच्या विभागणीला किंवा फरकाला कारणीभूत होत असतात.

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

## आवश्यकता व महत्व

"समाजात ज्यांना समान दर्जा आहे. अशा व्यक्तींचा समुदाय म्हणजे सामाजिक वर्ग होय" जाती, धर्म, भाषा इत्यादींचा बालकाच्या व्यक्तित्व विकासावर जसा परिणाम होतो तसा ग्रामीण क्षेत्राचाही होतो. ग्रामीण भागातील रीती, रिवाज, परंपरा अनुभव विश्व, तेथील जीवन व व्यवसाय मर्यादित असते. करमणुकीची साधने , वृत्तपत्रे, वाचनालय, सामाजिक व सांस्कृतिक संस्था, मोठ्या कचेरी, कारखाने, रस्ते, वाहाणे, दवाखाने, चित्रपट या सुविधा खेड्यांमध्ये नसतात. तेथील मुलांचे ज्ञानाचे क्षेत्र हे सीमित असते. घराघरातून वापरला जाणाऱ्या विविध प्रकारच्या आधुनिक उपकरणांची त्यांना माहिती नसते. शहरी अद्ययावत रितीरिवाजांचा त्यांना परिचय नसतो. खेड्यामध्ये सुशिक्षित व सधन लोकांची घरे ही फार थोडी असतात. त्यामुळे मुले सतत अशिक्षित, असंस्कृत वातावरणात वावरत असतात. मुलांची भाषा सुद्धा अशुद्ध असते. खेड्यातील मुलांना चांगले संस्कार, सुसंस्कृत आणि वैज्ञानिक वातावरण या सोयी नसल्यामुळे बुद्धिमत्ता असूनही त्यांचा शैक्षणिक व सांस्कृतिक स्तर खालावलेला असतो. प्रत्येक गावाच्या काही सामाजिक रूढी, परंपरा, प्रथा असतात आणि त्या सर्वांचे पालन करावे लागते. त्यामध्ये बदल सहजासहजी घडवून येत नाही. कोणताही समाज व्यवस्थेत आर्थिक व्यवहाराला फार महत्त्वाचे स्थान असते. कारण अर्थव्यवस्थेबरोबरच बऱ्याच प्रमाणात समाज व्यवस्थेचा डोलारा उभा असतो. ही अर्थव्यवस्था समाजजीवन नियंत्रित करते. आज जेव्हा आपण समाजात विशेषतः ग्रामीण क्षेत्रांमध्ये आर्थिक परिस्थितीचा विचार केल्यास एकंदरीत समाजाच्या अर्थत्पादनाचे व अर्थाजनाचे स्वरूपच बदलून गेले. जाती केंद्रित व्यवसायावर आधारलेली अर्थव्यवस्था कोलमडून पडली. अर्थाजनाची कोणतीही बंधने आज व्यक्तीवर राहिली नाही. भारतातील बहुसंख्य जनता दारिद्यात खितपत पडलेली आहे . अन्न ,वस्त्र, निवारा यासारख्या जीवनाच्या प्राथमिक व अत्यावश्यक गरजा भागविण्याचे देखील सामर्थ्य तिच्यात नाही. या

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

परिस्थितीत मुलांच्या विकासाकडे लक्ष देण्यास कोणास वेळ आहे? पैसा, शैक्षणिक वातावरण यांच्या अभावी जन्मतः बुद्धिमान असलेल्या अनेक मुलांची बुद्धी गंजून जात आहे. सरकार मागास विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था करीत आहे हे खरे. परंतु केवळ शैक्षणिक सवलतींनी ही समस्या पूर्णपणे सुटणार नाही. त्यासाठी जनतेचे दारिद्य्र दूर होऊन तिचा आर्थिक स्थर वाढविणे हे आवश्यक आहे. तेव्हाच या सवलतीचा योग्य रीतीने उपयोग करून घेण्याला पोषक असे वातावरण घराघरातून निर्माण होऊ शकेल व तेव्हाच मुलांवर होणारे संस्कार, सवयी अशा अनेक अडचणी यांचे निवारण होऊन त्यांचा विकास होऊ शकेल. याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे अशा परिस्थितीचा मुलांच्या भावी जीवनावर होणारा परिणाम दरिद्री वातावरणात रखडणाऱ्या मुलांमध्ये धनवान व्यक्तीबद्दल हेवा ,आर्थिक विषमते विरुद्ध संताप, श्रीमंता बद्दलची चीड अशा प्रवृत्ती निर्माण होण्याची शक्यता असते. तसेच मुलांच्या सवयी, जीवनावश्यक दृष्टिकोन, मूल्य व चारित्र्य हेही बऱ्याच प्रमाणात त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर व त्यातून त्यांना येणाऱ्या अनुभवावर अवलंबून असते. त्यांचा जीवनावर व व्यक्ती विकासावर आर्थिक सामाजिक परिस्थितीचा परिणाम होतो. सोबतच त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर देखील खूप परिणाम होतो हेच या संशोधनाचे महत्त्व आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

१) शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीची तुलना करणे.

२) शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक गुणसंपदानावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

## परिकल्पना

१) शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तरांमध्ये सार्थक फरक नसतो.

२) शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक गुणसंपदानावर लक्षणीय परिणाम दिसून येत नाही.

## संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

१) प्रस्तुत संशोधन गडचिरोली जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

२) माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींचा व मुलांचा यात समावेश करण्यात आला आहे.

३) गडचिरोली जिल्ह्यातील शहरी भागातील चार व ग्रामीण भागातील चार शाळांचा यात समावेश केलेला आहे

४) शहरी भागातील 120 मुली व मुले व ग्रामीण भागातील 120 मुले व मुली अशा एकूण 240 विद्यार्थ्यांचा यात समावेश करण्यात आलेला आहे.

५) प्रस्तुत संशोधनासाठी मराठी माध्यमांच्या शाळांचा विचार करण्यात आलेला आहे.

## संशोधन पद्धती

शालेय सर्वेक्षणात विविध बाबींची सद्यस्थिती त्यातील आवश्यक बदल आणि त्याकरिता आवश्यक असलेले उपाय याकरिता शालेय सर्वेक्षण पद्धतीची निवड संशोधनात करण्यात आली.

## संशोधनाची साधने

Rajiv Bharadvaj यांनी प्रमाणित केलेली सामाजिक आर्थिक स्तर मापिका शहरी व ग्रामीण (Soci-Economic status Scale-Urban and Rural)

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

Relibility-.76

Validity-Content

This scale consist 25 items divided into VII Areas-

a) Social

b) Family

c) Profession

d) Caste

e) Total Assets

f) Monthaly Income

It may be used for both rural and urban population. It provides separate scores for social and economic status (age group 13+)

वरील संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला.

## जनसंख्या

गडचिरोली जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील आठ माध्यमिक शाळेतील आठवी, नववी व . दहावीचे सर्व मुले-मुली प्रस्तुत संशोधनातील जनसंख्या आहे.

## न्यादर्श

गडचिरोली जिल्ह्यातील शहरी भागातील माध्यमिक शाळेतील चार व ग्रामीण भागातील चार माध्यमिक शाळेतील इयत्ता आठवी, नववी व दहावीचे मुले- मुली याद्दच्छिक न्यादर्श पद्धतीने निवडण्यात आले. न्यादर्शनात १२० शहरी विद्यार्थ्यांचा व १२० ग्रामीण विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला. याप्रमाणे न्यादर्शनात समाविष्ट एकूण विद्यार्थी संख्या २४० ठरते .

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

**सारणी क्रमांक (१)**

न्यादर्श शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या दर्शविणारी सारणी

| अनु. क्र. | शहरी माध्यमिक शाळा | विद्यार्थी संख्या (मुले व मुली) | ग्रामीण माध्यमिक शाळा | विद्यार्थी संख्या (मुले व मुली) |
|---|---|---|---|---|
| १) | महात्मा गांधी हायस्कूल, गडचिरोली | ३० | आंबेडकर विद्यालय आरमोरी, जि. गडचिरोली | ३० |
| २) | ज़िल्हा परिषद हायस्कूल, गडचिरोली | ३० | हितकारणी विद्यालय आरमोरी, जि. गडचिरोली | ३० |
| ३) | शिवाजी हायस्कूल, गडचिरोली | ३० | इंदिरा गांधी हायस्कूल आरमोरी, जि. गडचिरोली | ३० |
| ४) | मराठी माध्यमिक हायस्कूल, गडचिरोली | ३० | स्वर्गीय एस पी कोवासे विद्यालय मोखाळा, जि. गडचिरोली | ३० |
| | एकूण | १२० | | १२० |
| | एकूण विद्यार्थी संख्या = २४० | | | |

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

## माहितीचे संकलन सांख्यिकी विश्लेषण व अर्थनिर्वेचन

प्रस्तुत संशोधनात माहितीचे विश्लेषण करण्यासाठी खालील सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला. मध्यमान, प्रमाण विचलन व फरक दाखविण्याकरिता 't' मूल्य व स्तंभालेख आणि सहसंबंध दाखविण्याकरिता Pearsons Product Method चा वापर करण्यात आला. सामाजिक व आर्थिक स्तराचा शैक्षणिक गुणसंपदानावर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी (Family, Social Education, Profession, Cast, Total Assets, Monthly Income). या सहा घटकांचा उपयोग करण्यात आला या उपघटकावरून प्रत्येक विद्यार्थ्याला गुणधर्म देण्यात आले.

### परिकल्पना (१)

शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तरांमध्ये सार्थक फरक नसतो.

### सारणी क्रं. (२)

| अ.क्र. | सामाजिक आर्थिक स्तरीकरणातील घटक | शहरी भाग विद्यार्थी संख्या १२० | | ग्रामीण भाग विद्यार्थी संख्या १२० | | मध्यमानातील फरक | टी (t) मूल्य | सार्थकता स्तर (Significant Level) ०.०१ | सार्थकता होय/नाही (Significant Yes/No) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मध्यमान (Mean) | प्रमाण विचलन (SD) | मध्यमान (Mean) | प्रमाण विचलन (SD) | | | | |
| १ | कुटुंब | **१२१.००** | ३३.६८ | ८७.०० | २६.१७ | ३४.०० | ८.७३ | ०.०१ | सार्थकता नाही (No Significant) |
| २ | समाज | **८५.१७** | २६.२० | ६३.०० | १७.५५ | २२.१७ | ७.७० | | |
| ३ | शिक्षण | **३६.८३** | १९.२६ | १२.०० | ८.६४ | २४.८३ | १२.८९ | | |
| ४ | व्यवसाय | **८०.२५** | २३.७१ | ४४.३३ | ११.३३ | ३५.९२ | १४.९७ | | |
| ५ | जात | **७.७५** | ५.४७ | ६.०० | ४.८९ | १.७५ | २.६१ | | |
| ६ | एकूण मालमत्ता | **१०१.६७** | २४.४३ | ४.०० | ३.४३ | ९७.६७ | ४३.३७ | | |

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | मासिक वेतन | **९३.५०** | २८.११ | ६.०० | ४.४४ | ८७.५० | ३३.६८ | | |
| | | **७५.१७** | २२.९८ | ३१.७६ | १०.९२ | ४३.४१ | १७.७१ | | |

## निरीक्षणे

वरील सारणी वरून असे दिसून येते की,

१) शहरी भागातील विद्यार्थी व ग्रामीण भागातील विद्यार्थी यांच्या सामाजिक आर्थिक स्तरीकरणाच्या घटकांच्या आधारे तुलना केली असता मध्यमान क्रमशः ७५.१७ व ३१.७६ आढळून आले आणि प्रमाणविचलन २२.९८ व १०.९२ आढळून आले.

२) स्वाधीनता मात्रा (df) = २४० - २ = २३८ करिता 't' मूल्यांची सार्थकता ०.०१ या स्तरावर २.५८ असणे आवश्यक आहे.

३) प्राप्त"t' मूल्य १७.७१ आहे . ०.०१ या स्तरावर या स्तरावर सारणी मूल्यापेक्षा जास्त आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्या करावा लागेल.

अन्वयार्थ

वरील विश्लेषणावरून असे आढळून येते की ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व शहरी भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थी यांचे संपूर्ण निरीक्षणाच्या आधारे तुलना केली असता त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्तरांमध्ये लक्षणीय फरक आहे.

ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा उच्च मध्यम निम्न सामाजिक आर्थिक स्तर दर्शविणारी सारणी


CONFLUX
JOURNAL OF EDUCATION
ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

**सारणी क्रं. (३)**

| वर्ग | सामाजिक आर्थिक स्तर | | | |
|---|---|---|---|---|
| | शहरी विधार्थी | शेकडेवारी | ग्रामीण विधार्थी | शेकडेवारी |
| उच्च स्तर | २३ | १९.१७ | १३ | १०.८३ |
| मध्यम स्तर | ५३ | ४४.१७ | ४९ | ४०.८३ |
| निम्म स्तर | ४४ | ३६.६७ | ५८ | ४८.३३ |
| एकूण | १२० | १००% | १२० | १००% |

ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा उच्च, मध्यम, निम्न सामाजिक आर्थिक स्तर

दर्शविणारा स्तंभालेख



CONFLUX
JOURNAL OF EDUCATION

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)

Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

## अन्वयार्थ

१) ग्रामीण व शहरी भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा सामाजिक आर्थिक स्तर अभ्यासला असता. ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्च स्तरात १३, मध्यम स्तरात ४९ व निम्नस्तरात ५८ आढळतात . तर शहरी भागातील विद्यार्थी उच्च स्तरात २३, मध्यम स्तरात ५३ व निम्नस्तरात ४४ आढळतात.

२) या आधारे असे निदर्शनास येते की, ग्रामीण भागापेक्षा शहरी भागामध्ये उच्च स्तरातील व मध्यम स्तरातील विद्यार्थी अधिक प्रमाणात आढळतात तर निम्नस्तरातील विद्यार्थी ग्रामीण भागात अधिक आढळतात.

## परिकल्पना (२)

शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक गुणसंपदानावर लक्षणीय परिणाम दिसून येत नाही

**सारणी क्रं. (४)**

| अ.क्र. | सामाजिक आर्थिक स्तरीकरणातील घटक | सहसम्बंध | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|
| १ | कुटुंब | .७२ | ०. ०.१ |
| २ | समाज | .६८ | |
| ३ | शिक्षण | .८२ | |
| ४ | व्यवसाय | .७० | |
| ५ | जात | .९२ | |

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | एकूण मालमत्ता | .६७ | |
| ७ | मासिक वेतन | .६७ | |
| | एकूण | .७६ | |

## निरीक्षणे

१) वरील सारणी Karl Pearsons Product च्या साह्याने माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्तरीकरणातील उपघटकातील गुणाकांवरून मध्यमानाच्या आधारे सहसंबंध काढण्यात आला तो .७६ आहे. त्यानुसार स्वाधीनता मात्रा (df) = २४० - ०२ = २३८ करिता सारणी मूल्य( क्रमशः.७२, .६८, .८२, .७०, .९२, .६७, .६७) या स्तरावर तपासण्यात आला.

२) शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीचा व शैक्षणिक . गुणसंपादनाचा अभ्यास केला असता प्राप्त .'r' मूल्य हे ०.०.१ स्तरावर जास्त आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल .

## अन्वयार्थ

वरील विश्लेषणावरून असे आढळून येते की शहरी व ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक गुणसंपदावर लक्षणीय परिणाम होतो म्हणजेच सामाजिक आर्थिक स्थितीचा व शैक्षणिक गुणसंपदाण्याचा लक्षणीय संबंध आहे

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

## निष्कर्ष

१) शैक्षणिक क्षेत्रामध्ये जे संशोधन केले जाते त्याचा उद्देश शिक्षणाच्या वर्तमान स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणणे होय. प्रस्तुत संशोधनातून जे निष्कर्ष प्राप्त झाले आहे त्यावरून असे दिसून येते की ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक गुणसंपदावर परिणाम होतो.

२) सामाजिक व आर्थिक परिस्थितीनुसार कमकुवत असणारे पालक सरकारी शाळेत त्यांना परवडतील अशा शाळेमध्ये आपल्या पाल्यांचा प्रवेश करतात .बहुतांश सरकारी शाळेची स्थिती काही शाळा वगळता खूपच निराशाजनक आहे. शाळेतील वातावरण, शिक्षकांचा दर्जा, विषय अध्यापन कौशल्यांचा अभाव, शैक्षणिक साधनांची कमतरता,शाळेतील अस्वच्छता, पावसाळ्यात. गळणारे वर्ग अशा स्थितीत विद्यार्थ्यांचे गुण संपादन कसे होणार?

३) वरील सर्व समस्यांकडे शाळेतील शिक्षक, समाजातील लोक, शासन यांनी लक्ष दिले तर विद्यार्थ्यांचा गुणसंपदानाचा दर्जा सुधारू शकतो.

४) शैक्षणिक गुणसंपदानाच्या बाबतीत विद्यार्थ्यांचा विचार केल्यास असे लक्षात येते की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपेक्षा शहरी भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गुणसंपादन हे चांगले आहे कारण शहरी भागातील विद्यार्थी हे समाज, पालक, शिक्षक व कुटुंबाकडून प्रोत्साहने प्रेरित झालेले असतात .त्यांना पोषक असे वातावरण मिळते. या उलट स्थिती ही ग्रामीण विद्यार्थ्यांची असते.

## संदर्भ

8th All India School Education Survey Report (2015). Medium of instruction and languages taught, 8th AISES; A Concise Report, NCERT, New Delhi, pp:28.

American Psychological Association. (2018). Socio-economic status. Retrieved from

http://www.apa.org/topics/socioeconomic-status/

Annual Status of Education Report (2014). Annual Status of Education Report – 2014. http://img.asercentre.org/docs/Publications /ASER%20Reports/ASER%

Bandyopadhyay, S., Bardhan, A., Dey, P., & Bhattacharyya, S. (2021). Exploring Rural–Urban Education Divide in India. In Bridging the Education Divide Using Social Technologies (pp. 163-190). Springer, Singapore.

Bofah, E. A., & Hannula, M. S. (2017). Home resources as a measure of socioeconomic status in Ghana. Large-scale Assessments in Education, 5(1), 1–15.

Egunsola, A. O. E. (2014). Influence of home environment on academic performance of secondary school students in agricultural science in Adamawa State Nigeria. Journal of Research & Method in Education, 4(4), 46-53.

Islam, M. R., & Khan, Z. N. (2017). Impact of socio-economic status on academic achievement among the senior secondary school students. Educational Quest: An International Journal of Education and Applied Social Sciences, 8(2), 665.

Jayawardena, P. R., van Kraayenoord, C. E., & Carroll, A. (2020). Factors that influence senior secondary school students' science learning. International Journal of Educational Research, 100, 101523.

Karlidag-Dennis, E., Hazenberg, R., & Dinh, A. T. (2020). Is education for all? The experiences of ethnic minority students and teachers in North-western Vietnam engaging with social entrepreneurship. International Journal of Educational Development, 77, 102224.

Kumar, K. U., & Rajendran, S. (2016). A Study on Water and Sanitation Facilities in Higher Secondary Schools in Salem District, Tamil Nadu. Arthshastra Indian Journal of

ISSN 2320-9305 (Print)
ISSN 2347-5706 (Online)
Volume 12 Issue 1 December 2023
https://www.cjoe.naspublishers.com/

Economics & Research, 5(6), 21-30.

Lazenby, H. (2016). What is equality of opportunity in education? Theory and Research in Education, 14(1), 65-76.

Okoro, J. P. (2020). Transforming Higher Education for Socio-Economic Development and Peacebuilding in Africa. Addaiyan Journal of Arts, Humanities and Social Sciences, 2(6), 20-34.

Singh, K. (2014). Right to education and equality of educational opportunities. Journal of International Cooperation in Education, 16(2), 5-19.

Tilak, J. B. (2021). Education Policy and Practice in India. In Education in India: Policy and Practice.

UDISE Report on School Education – 2018-19, Ministry of Human Resource Development, Government of India. http://dashboard.udiseplus.gov.in/#!/reports.